पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १८

**सभावृत्तांत**

दिनांक - **१४/०२/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **१४/०२/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.सागर बाळासाहेब गवळी - सभापती

२. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे - उपसभापती

३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र

४. मा.गीता सुशिल मंचरकर

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले -</u>**

विषय क्र.१) थेरगाव आरक्षण क्र. ६२८ खेळाचे मैदान येथील आरक्षण बाधित नागरिकांची निवासी घरे आरक्षणातून वगळणे किंवा निवासी नागरिकांच्या हिताचा निर्णय घेणेबाबत - मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...

विषय क्र.२) गांधीनगर झोपडपट्टी ही झोपडपट्टी म्हणून घोषित करणेबाबत - मा.गीता मंचरकर, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...

विषय क्र.३) मौजे पिंपरी वाघेरे मधील भूसंपादनाकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत - मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...

विषय क्र.४) मौजे पिंपरी वाघेरे मधील भूसंपादनाकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत - मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...

----------

**मा.विकास डोळस** – दिनांक **०९/०१/२०१८ व २३/०१/२०१८** रोजी झालेली सभा **(कार्यपत्रिका क्र.१७)** चे सभावृत्तांतामध्ये विषय क्रमांक ०१ ते ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा याऐवजी दिनांक २७/०२/२०१८ च्या सभेच्यावेळी करणेत यावा या दुरुस्तीसह सभावृत्तांत कायम करणेत यावा.

दिनांक **०९/०१/२०१८ व २३/०१/२०१८** रोजी झालेली सभा (कार्यपत्रिका क्र.१७) चे सभावृत्तांतामध्ये विषय क्रमांक ०१ ते ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा याऐवजी दिनांक २७/०२/२०१८ च्या सभेच्यावेळी करणेत यावा या दुरुस्तीसह दिनांक **०९/०१/२०१८ व २३/०१/२०१८** रोजी झालेली सभा **(कार्यपत्रिका क्र.१७)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

<u>सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-</u>

ठराव क्रमांक - ४८ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १४/०२/२०१८

सुचक : मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे अनुमोदक : मा. विकास डोळस

संदर्भ : मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.२४ थेरगाव येथील आरक्षण क्र.६२८ खेळाचे मैदानाच्या कडेला २० ते २२ नागरिकांची निवासी घरे आहेत. आरक्षण विकसित करणेसाठी आवश्यक ८५ टक्के क्षेत्र मनपाच्या ताब्यात आलेले आहे. आरक्षणामुळे बाधित झालेले सदरचे नागरिक गेली २५ वर्षापासुन वास्तव्यास आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती नाजुक असुन त्यांना शहरात अन्यत्र राहण्याची घरे नाहीत. सदरचे आरक्षित खेळाचे मैदान तेथे रहात असलेल्या २० ते २२ नागरिकांची घरे वगळुन उर्वरित ताब्यात असलेल्या जागेत विकसित होऊ शकते. सदर आरक्षणाच्या जागेत घरे असलेल्या जागेचे भुसंपादन २२ नागरीकांची घरे वगळण्याची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४९ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १४/०२/२०१८

सुचक : मा.गीता मंचरकर अनुमोदक : मा.विकास डोळस

संदर्भ : मा.गीता मंचरकर, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी पिंपरी येथे गांधीनगर झोपडपट्टी आहे. ही झोपडपट्टी, झोपडपट्टी म्हणून घोषित नसल्याने तेथील नागरिकांना कोणत्याही शासकिय योजनांचा लाभ मिळत नाही. येथील रहिवीशी आर्थिक दुर्बल घटकातील मोलमजुरी

करणारे आहेत. त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी ही झोपडपट्टी म्हणून घोषित होणे गरजेचे आहे. तरी गांधीनगर झोपडपट्टी ही झोपडपट्टी घोषित करून गांधीनगर मध्ये जेवढी जागा आरक्षित जागा आहे. त्या जागेचे मोज माप घेऊन झोपडपट्टीचे पुनर्वसन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५० विषय क्रमांक - ०३

दिनांक - १४/०२/२०१८

सुचक : मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे अनुमोदक : मा.विकास डोळस

संदर्भ : मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीतील सुधारित मंजूर विकास योजने नुसार मौजे पिंपरी वाघेरे मधील स.न.२,३,४,५ व ११ यास सी.स.न. ८६६, ८६८, ८६९, ८७०, ८७१, ८७४, ८७५, ८७७, ८७८ व ८७९ या मिळकती मधून १५.०० मी. रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे. सदर रस्त्याचा भाग हा एफ.एस.आय, टी.डी.आर. द्वारे महापालिकेच्या ताब्यात आलेला आहे. सदरच्या रस्त्याचा बहुतांश भाग हा महापालिकेच्या ताब्यात आलेला नाही. सदरचा रस्ता विकसित झाल्यास पिंपरी गावाकडे जाणा-या रस्त्यावरील ताण कमी होऊन वाहतूक सुलभ होणार आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५१ विषय क्रमांक - ०४

दिनांक - १४/०२/२०१८

सुचक : मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे अनुमोदक : मा.विकास डोळस

संदर्भ : मा.शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीतील सुधारित मंजूर विकास योजने नुसार मौजे पिंपरी वाघेरे मधील स.न.७,२२३ व २२४ यांसी सी.स.न. ९४०, ९५६, १०५४, १०५५, १०६१, १०७९, १०८०, ७५० व ७५१ या मिळकती मधून १८.०० मी. रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे. सदर रस्त्याचा भाग हा एफ.एस.आय, टी.डी.आर. द्वारे महापालिकेच्या ताब्यात आलेला आहे. सदरच्या रस्त्याचा बहुतांश भाग हा महापालिकेच्या ताब्यात आलेला नाही. सदरचा रस्ता विकसित झाल्यास पिंपरी गावाकडे जाणा-या रस्त्यावरील ताण कमी होऊन वाहतूक सुलभ होणार आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे

शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सागर बाळासाहेब गवळी)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७६/२०१८
दिनांक : २१/०२/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.